## <u>मोटार अपघात दावा अर्ज क्र.१०४/१५ मधील नि.६ खालील आदेश</u>

अर्जदार यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १६६ नुसार केलेल्या मुख्य अर्जात, या अर्जाद्वारे त्या अधिनियमाखालील कलम १४० नुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केलेली आहे.

२. अर्जदारांचे कथनानुसार दि.१०/०६/२०१४ रोजी रात्री ०७.३० वा. चे सुमारास चिंचणी ते सोनकिरे मार्गावर चिंचणी, ता. कडेगांव, जि. सांगली गांवचे हद्दीत सर्जेराव शिवराम शेनोलीकर हे यामाह मोटारसायकल क्र.सी.आर.एल्-९९९२ वरून शेनोली बाजुकडे जात असताना, सामनेवाले क्र.१ यांच्या मालकीचा टाटा डंपर क्र.एम्.एच्./१३/ए.एन्-२८५३ हा सामनेवाले क्र.२ ने भरधाव वेगात निष्काळजीपणे चालवून त्यांचे मोटारसायकलला धडक दिली आणि त्यामध्ये ते गंभिररित्या जखमी होवून उपचारा दरम्यान दि.१६/०६/२०१४ रोजी मयत झाले. अपघाताचे वेळी सदरचे वाहन सामनेवाला क्र.१ यांच्या मालकीचे होते आणि या वाहनाचा विमा सामनेवाला क्र. ३ बजाज अलियान्स जनरल इन्शुरन्स कं.लि. या विमा कंपनीकडे उतरविलेला असल्याने, सर्व सामनेवाले नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत.

३. सामनेवाले क्र.१ व २ यांनी नि.१७ प्रमाणे कैफियत दिलेली आहे. सामनेवाले क्र.३ यांनी कैफियत दिलेली नाही.

४. अर्जदारांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदारांनी यादी (नि.४) सोबत हजर केलेले प्राथमिक तपासणी अहवाल व घटनास्थळ पंचनामा यावरून अर्जदारांच्या कथनाप्रमाणे वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी अपघात झाल्याचे आणि सदरहू वाहने त्या अपघातात सामील असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

५. अर्जदार यांनी हजर केलेल्या विमा प्रमाणपत्राची प्रत सकृतदर्शनी असे दर्शविते की, टाटा डंपर क्र.एम्.एच्./१३/ए.एन्-२८५३ चा सामनेवाले क्र.३ यांचेकडे सामनेवाले क्र.१ यांनी मालक या नात्याने दिनांक २८/०३/२०१४ ते २७/०३/२०१५ या कालावधीसाठी विमा उतरविलेला होता आणि अपघाताचे दिवशी सदरहू वाहन सामनेवाले क्र.३ यांच्याकडे विमा संरक्षित होते.

६. अर्जदार यांनी हजर केलेले शव विच्छेदन अहवाल आणि मयताचा पंचनामा यावरून असे स्पष्ट होते की, सर्जेराव शिवराम शेनोलीकर यांचा अपघातामध्ये गंभिर जखमी झाल्यामुळे मृत्यू झालेला आहे. वरील सर्व परिस्थितीत अर्जदार हे कलम १४० अन्वये अंतरिम नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत आणि सामनेवाले क्र.१ व ३ हे स्वतंत्र आणि संयुक्तिकरित्या नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:

**: <u>आ दे श</u> :**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.१ व ३ यांनी स्वतंत्र आणि संयुक्तिकरित्या अर्जदारास नुकसान भरपाई म्हणून रक्कम रू.५०,०००/-(रू. पन्नास हजार फक्त) या आदेशापासून ३० दिवसाचे आत अर्जदार क्र.१ यांना रू.३०,०००/- (रू. तिस हजार फक्त) आणि अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी रू.१०,०००/- (रू. दहा हजार फक्त) प्रमाणे स्वतंत्र रेखांकित धनादेशाने द्यावी. सदरहू रक्कम मुदतीत न दिल्यास त्यावर अर्जदाखल तारखेपासुन संपूर्ण रक्कम फिटेपर्यंत द.सा.द.शे.७.५ टक्के दराने व्याज देण्यास सामनेवाला क्र.१ व ३ जबाबदार राहतील.

३. येणेप्रमाणे अंतरिम निवाडा करण्यात यावा.

सातारा.
दिनांक:१२/१०/२०१५

(एस्. एम्. गव्हाणे)
अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण
सातारा.